लोकसत्ता पु-पा-५.


# वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांच्या बदल्या

## निवडणूक आयोगाचे नवीन परिपत्रक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने काढलेल्या नवीन परिपत्रकाचा फटका मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सुमारे ४० वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना बसणार आहे. एका आयुक्तालयात दोन जिल्हे असल्यास ३ वर्षे पूर्ण झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्याचे निर्देश आयोगाने पोलीस महासंचालकांना दिले आहेत. लोकसभानिवडणूकीपूर्वी बदली होऊन आलेल्या अनेक अधिकाऱ्यांना या नव्या आदेशाचा फटका बसणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने नवीन परिपत्रक काढले आहे. आयुक्तालयात दोन जिल्हे असतील आणि ज्या पोलिसांची मागील ४ वर्षांत ३ वर्षे सेवा झाली असेल अशा पोलिसांची आयुक्तालयाबाहेर बदली करण्याचे निर्देश पोलीस महासंचालाकांना दिले आहेत. या आदेशामुळे मुंबई, नवी मुंबई आणि मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अडीचशे पोलिसांची बदली होणार आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात ठाणे आणि पालघर असे दोन जिल्हे आहेत. त्यामुळे या आयुक्तालयातील तब्बल ४० पोलीस अधिकाऱ्यांचा बदल्या होणार आहेत.



### नुकतीच बदली झालेल्यांना फटका

लोकसभा निवडणुकीपूर्वी आयुक्तालयाने पहिले परिपत्रक काढले होते. पोलीस आयुक्तालयात एकापेक्षा जास्त जिल्हा असतील तर बदलीपात्र अधिकाऱ्यांना दुसऱ्या जिल्ह्यात सामावून घ्यावे असे निर्देश होते. या आदेशामुळे १९ पोलिसांच्या आयुक्तालयातच बदल्या झाल्या होत्या. मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयात पालघर आणि ठाणे असे दोन जिल्हे आहेत. त्यामुळे पोलिसांच्या या दोन्ही जिल्ह्याबाहेर राज्यात कुठेही बदल्या केल्या जाऊ शकतील. अनेक पोलीस अधिकारी काही महिन्यांपूर्वीच बदली होऊन आले होते. ते स्थिरस्थावर होत असतानाच निवडणूक आयोगाच्या नव्या आदेशाने त्यांची पुन्हा बदली होणार आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील एकूण ४० पोलिसांना फटका बसणार असून त्यांच्या बदल्या होणार आहेत.

### पोलिसांमध्ये नाराजी

या बदल्यांमुळे पोलीस अधिकाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. आमची आयुक्तालयातील ६ वर्षे पूर्ण झालेली नाहीत. आम्ही काही महिन्यांपूर्वीच पदभार स्विकारला आहे. तरी आता आमची बदली होणार असेल तर हे अन्यायकारक आहे, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. आम्ही आमच्या हद्दीत घरे घेतली असून मुलांचे शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतले आहेत. मात्र या बदलीमुळे सगळे विस्कळीत होणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. निवडणूक आयोगाचा हा निर्णय मनमानीपणाचा आहे. महसूल आणि पालिका अधिकाऱ्यांना तो लागू नाही. फक्त पोलिसच का लक्ष्य केले जातात, अशी भावना अनेक पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्ती केली.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता ५-५१-९.

## भाईंदर, वसईत नऊ महिन्यांत १२८ जणांच्या आत्महत्या

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** मिरा भाईंदर वसई विरार शहरात आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. मागील नऊ महिन्यात तब्बल २१८ जणांनी आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे.

मिरा भाईंदर, वसई विरार शहरात आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे या आत्महत्या होत आहेत. सामाजिक कार्यकर्ते सचिन जांभळे यांना माहिती अधिकाराअंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार आयुक्तालयाच्या हद्दीत जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत एकूण २१८ आत्महत्यांची नोंद झाली. त्यात १३ पुरूष, ५१ महिलांचा समावेश आहे.

तसेच २४ अल्पवयीन मुले आणि १३ मुलींचा समावेश आहे. मागील वर्षी २०२३ मध्ये ४३३ आत्महत्या झाल्या होत्या. कौटुंबिक कलह, प्रेमभंग, आजारपण, परीक्षेतील अपयश तसेच क्षुल्लक कारणामुळे आत्महत्या केल्या जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अनेक जण आत्महत्या करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतात. परंतु अशा प्रकरणात कुणावरही आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

# कांदळवनांच्या जागेत पुन्हा अतिक्रमण

## कारवाई थंडावताच भूमाफिया सक्रिय

कल्पेश भोईर, लोकसत्ता

**वसई:** वसई, विरारच्या खाडी किनाऱ्यावर, पाणथळ जागेत असलेल्या कांदळवनांची कत्तल, माती भराव, अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कारवाई सुरू केली होती. मात्र नंतर कारवाई थंडावल्याने भूमाफिया सक्रिय झाले आहेत.

समुद्र किनाऱ्यावरील पाण्याचा प्रवाह रोखणे, जमिनीची होणारी धूप थांबविणे, सुनामी, चक्रीवादळ आणि पुरापासून संरक्षण करणे, समुद्राचे प्रदूषण कमी करणे अशांसाठी कांदळवने उपयोगी असतात. कांदळवनाचे संवर्धन होणे गरजेचे आहे. मात्र शहरात भूमाफियांकडून कांदळवनांच्या जागेत अतिक्रमण वाढू लागले आहे. कांदळवनांचे संवर्धन व्हावे यासाठी वर्षभरापूर्वी वसईच्या महसूल विभागाने अतिक्रमण करणाऱ्या विरोधात कारवाई सुरू केली होती. त्यावेळी त्यांनी नायगाव, ससूनवघर, जूचंद्र, शिरगाव, नारिंगी अशा विविध ठिकाणच्या भागात अतिक्रमण करणाऱ्यावर गुन्हे दाखल केले होते. मात्र कारवाई थंडावताच पुन्हा भूमाफियांनी अतिक्रमण करण्यास सुरुवात केली आहे, असे पर्यावरण प्रेमींनी सांगितले. या प्रकाराबाबत वर्षभरात १३ गुन्हे दाखल झाले आहेत. अजूनही १० तक्रारी आहेत त्यांची चौकशी करून कारवाई केली जाईल, असे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे. निवडणुकीची कामे पार पडल्यानंतर पुन्हा व्यापक मोहीम घेऊन कारवाई केली जाईल, असे वसईचे उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांनी सांगितले.



### वाळू उपशामुळे कांदळवने नष्ट

विरारजवळील वैतरणा खाडीतही मागील काही वर्षांपासून छुप्यामार्गाने बेकायदा वाळू उत्खनन केले जाते. याचा परिणाम हा खाडीत व खाडीकिनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रावर होऊ लागला आहे. सक्शन पंप लावून हे उत्खनन होत असल्याने हळूहळू खाडी जवळील भाग खचू लागला आहे. त्यामुळे त्यावर असलेले कांदळवनही नष्ट होत आहेत. याकडे महसूल यंत्रणेचे दुर्लक्ष होत आहे. वीस वर्षाच्या कालावधीमध्ये सुमारे १४९ हेक्टर इतके कांदळवन क्षेत्र नष्ट झाल्याची धक्कादायक बाब माहिती अधिकारातून समोर आली आहे.

### नायगाव पोलीस ठाण्यात अतिक्रमणाचे गुन्हे

- नायगाव पूर्वेच्या जूचंद्र परेरा नगर परिसरात कांदळवनांची कत्तल व अतिक्रमण करण्याचे प्रकार वाढू लागले आहेत.
- कांदळवनावर माती भराव टाकून अनधिकृत बांधकाम व अन्य अतिक्रमण केले जात आहे. २०२३ मध्ये महसूल विभागाच्या तक्रारीवरून ससूनवघर, बापाणे, जूचंद्र या भागातील सहा गुन्हे नायगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत.

> कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमणावर तक्रारी आल्यानंतर त्यावर कारवाई करण्याचे काम सुरूच आहे. निवडणुकीची कामे पार पडल्यानंतर पुन्हा एकदा व्यापक मोहीम घेऊन कारवाई केली जाईल. **-शेखर घाडगे,** उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी, वसई.

लोकसत्ता पृ-५-१.

# महामार्गावर कंटेनरच्या अपघातामुळे वाहतूक कोंडी

## अपघातात दोन चालक जखमी, तानसा पुलाजवळील घटना

लोकसत्ता प्रतिनिधी



**वसई:** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील तानसा पुलाजवळ दोन कंटेनर वाहनांची धडक होऊन अपघात घडला आहे. गुरुवारी सकाळच्या सुमारास ही घटना घडली. यात दोन्ही चालक जखमी झाले आहेत.

या अपघाताच्या घटनेमुळे महामार्गावरील गुजरात मार्गिकेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. वसई पूर्वेच्या भागातून मुंबई व गुजरातला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. सद्यस्थितीत या महामार्गावर काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. या कामाचे योग्य ते नियोजन न झाल्याने सातत्याने वाहतूक कोंडी व अपघात या सारख्या घटना समोर येऊ लागल्या आहेत. गुरुवारी सकाळी गुजरातच्या दिशेने हा मालवाहतूक कंटेनर निघाला होता. मात्र त्या वाहनचालकाने अचानकपणे ब्रेक दाबला आणि पाठीमागून येणारा कंटेनर जोरात धडकला आणि अपघात घडला. धडक जोराची लागल्याने वाहनचालक व त्याचा साथीदार यात जखमी झाले होते. याची माहिती महामार्ग वाहतूक पोलिसांना मिळताच घटनास्थळी पोहचून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. त्यानंतर महामार्ग प्राधिकरणाच्या क्रेनला बोलावून अपघातग्रस्त कंटेनर हटविण्यात आले. या अपघातामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.

### कामाच्या नियोजनाचा अभाव

राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही मार्गावर काँक्रीटकरण सुरु आहे. मात्र वाहने ये-जा करण्यासाठी मार्ग व ते नियंत्रणासाठी वाहतूक सेवक यांच्या अभावामुळे सातत्याने महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. याचा मोठा फटका प्रवाशांना बसत आहे. याचे नियोजन नसल्याने वाहने वाट मोकळी मिळताच व मिळेल त्या जागेतून वाहने काढण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे कोंडी अधिक होते याशिवाय अपघाताच्या घटना घडत आहेत. गुरुवारी विरार फाट्या पासून ते चिंचोटी दरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.

म.टा. पृ-५-३.

# वसईत आगीच्या दोन घटना



म. टा. वृत्तसेवा, वसई

वसई, विरारमध्ये निवासी इमारतींमध्ये आग लागल्याच्या दोन घटना बुधवारी रात्री घडल्या आहेत. एका घटनेत नालासोपारा पूर्वेच्या आचोळे परिसरात निवासी इमारतीत एका गोदामाला भीषण आग लागली होती. तर दुसरीकडे वसई पूर्वेच्या मधुबन परिसरातील कर्मा हाईट्स इमारतीला आग लागल्याची घटना घडली. या दोनही घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसून अग्निशमन विभागाला आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे.

नालासोपारा पूर्वेच्या आचोळे साडी कंपाऊंड परिसरात एक रहिवासी इमारत आहे. त्या इमारतीत लग्न मंडप व डेकोरेशन साहित्य ठेवण्याचे गोदाम आहे. या गोदामात बुधवारी रात्री अचानकपणे भीषण आग लागली. आगीचा भडका मोठ्या प्रमाणात दिसत असल्याने नागरिक भयभीत झाले होते. या आगीची माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच त्यांनी घटनास्थळी पोहचून रहिवाशांना सुरक्षित बाहेर काढले आणि आगीवर नियंत्रण मिळवले. तर दुसऱ्या घटनेत वसई पूर्वेच्या मधुबन परिसरातील कर्मा हाईट्स इमारतीला आग लागली होती. शॉर्ट सर्किट झाल्यामुळे येथील १५ मजली रहिवासी इमारतीत आग लागल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी वीस ते पंचवीस जणांना सुखरूप बाहेर काढले.

# पैसे परत करण्याच्या बहाण्याने खाते रिकामे

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

ऑनलाइन ऑर्डर केलेल्या वस्तूंचे पैसे खात्यात पुन्हा जमा करण्याच्या नावाखाली मिरारोडमध्ये एका व्यक्तीची फसवणूक करण्यात आली आहे. त्याच्या बँक खात्यातील सर्व पैसे भामट्याने काढून घेतले आहेत. या प्रकरणी नयानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरारोडच्या नयानगर भागात राहणाऱ्या अलमास सरगुरु यांनी एका ऑनलाईन वेबसाईट वरून शाम्पू ,तेल आदी एक हजार रुपये किंमतीच्या वस्तू खरेदी केल्या. खरेदी केलेल्या वस्तू बरेच दिवस मिळाल्या नाहीत म्हणून त्यांनी वेबसाईटवर असलेल्या माहितीवरून त्यांच्या प्रतिनिधीशी संपर्क साधला. यावेळी त्यांचे एक हजार रुपये परत करण्यासाठी प्रथम त्यांना एक रुपया ऑनलाइन पाठविण्यास सांगण्यात आले. त्यावरून त्यांनी पैसे पाठवले असता काही वेळानंतर त्यांच्या बँक खात्यातील ७३ हजार रुपये काढून घेण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

म.टा. ५.११.१९.

# ४० पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार

म. टा. वृत्तसेवा, वसई

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने काढलेल्या परिपत्रकानुसार एका आयुक्तालयात दोन जिल्हे असल्यास ३ वर्षे पूर्ण झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या जिल्ह्याबाहेर बदली करण्याचे निर्देश पोलीस महासंचालकांना दिले आहेत. याचा फटका मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील सुमारे ४० वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना बसणार असून यामुळे अधिकाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात ठाणे आणि पालघर असे दोन जिल्हे आहेत. त्यामुळे या आयुक्तालयातील तब्बल ४० पोलिस अधिकाऱ्यांचा बदल्या होणार आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी आयुक्तालयाने पहिले परिपत्रक काढले होते. पोलिस आयुक्तालयात एकापेक्षा जास्त जिल्हा असतील तर बदलीपात्र अधिकाऱ्यांना दुसऱ्या जिल्ह्यात सामावून घेता येत असल्यास सामावून घ्यावे असे निर्देश होते. त्यामुळे मिरा भाईंदर, वसई विरार आयुक्तालयात पालघर आणि ठाणे असे दोन जिल्हे आहेत. या आदेशामुळे १९ पोलिसांच्या आयुक्तालयातच बदल्या झाल्या होत्या. ते पोलीस आताच स्थिरस्थावर होत असतानाच निवडणूक आयोगाच्या नव्या परिपत्रकाने एकूण ४० पोलिसांच्या बदल्या होणार आहेत.

या आदेशामुळे मुंबई, नवी मुंबई आणि मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील अडीचशे पोलिसांना या निर्णयाचा फटका बसणार आहे. अनेक अधिकाऱ्यांनी घरे, मुलांचे प्रवेश घेतले आहेत.

लोकमत ५.११.१९.



# फोटो एडिट करून व्हायरलची धमकी देत बलात्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाणे हद्दीतील एका गृहिणीचे फोटो एडिट करून ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर बलात्कार करणाऱ्या तरुणाला नवघर पोलिसांनी अटक केली आहे.

नवघर येथील एका महिलेचे फोटो २१ वर्षीय कंत्राटदाराने एडिट करून ते अर्धनग्न केले. ते फोटो पीडितेला दाखवून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच स्वतःच्या घरी व पीडितेच्या घरी सातत्याने तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केले. तसेच बाहेर येता-जाता पीडितेचा पाठलाग करून तो तिला त्रास देत असे. पीडितेच्या फिर्यादीनंतर नवघर पोलिसांनी २३ ऑक्टोबर रोजी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. सहायक पोलिस निरीक्षक संदीप पालवे हे अधिक तपास करत आहेत.

लोकमत ५.११.१९.

# मीरा रोडला धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा मीरा रोड पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे.

मीरा रोडच्या एस.के. स्टोन, सेंट्रल पार्क येथील सभागृहात ५ ऑक्टोबरला कॉनग्रिगेशन जेव्हॉवाज व्हिटनेसेस ट्रस्ट मिरजतर्फे आयोजित कार्यक्रमात प्रलोभन दाखवून धर्मांतरासाठी बोलावले. धर्मांतरण केल्यानंतर त्यांना काही रक्कम व आजारी व्यक्तीचा खर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च दिला जाईल, असे आमिष दाखविले होते. तेथे मूर्तींच्या पुढेच धार्मिक यहोवाचा संदेश आणि फोटो असलेला बॅनर लावल्याने माझ्या धर्माचा अपमान केला व सोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या, अशी फिर्याद नागनाथ कांबळे यांनी दिली. यावरून मीरा रोड पोलिसांनी २२ ऑक्टोबरच्या रात्री गुन्हा दाखल केला आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांनी सांगितले, फिर्यादीच्या सांगण्यावरून गुन्हा दाखल केला असला तरी आतापर्यंत धर्मांतरणाबाबत कोणतीही बाब वा पुरावा समोर आलेला नाही. त्याचा तपास आम्ही करत आहोत.

लोकमत ५.११.१९.

# पैशांसाठी आईनेच केला मुलीच्या शरीरविक्रयाचा सौदा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : एका आईने स्वतःच्या १३ वर्षीय मुलीला दोन लाख रूपयांसाठी शरीरविक्रयास प्रवृत्त करण्याची धक्कादायक घटना मीरा रोड भागात समोर आली. या मुलीचा दोन लाखांत सौदा करणाऱ्या तिच्या आईसह महिला दलालावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या दोघींनाही अटक झाली आहे. पोलिसांनी बोगस ग्राहकामार्फत सापळा रचून हाटकेश रस्त्यावरील एका हॉटेलात ही कारवाई केली. यामध्ये महिला दलाल शबिनाझ साजिद सय्यद (३५, रा. साई प्रसाद, प्लेझंट पार्क, मीरारोड) हिच्यासह आईला अटक करण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

# न्यायालयाच्या आदेशानंतरही कांदळवनात बेकायदा भराव

## प्रशासन चिडिचूप : नागरिकांचा आरोप, कारवाईची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कांदळवन संरक्षणाची जबाबदारी महापालिका, पोलिस, महसूल व कांदळवन विभागाची असतानाही घोडबंदर मार्गावर चेणे येथे राजरोसपणे कांदळवनात बेकायदा भराव सुरू आहे. प्रशासनाला या कांदळवनामधील बेकायदा भरावाची कल्पना दिल्यानंतरही त्यांच्याकडून कांदळवनाचा ऱ्हास करण्यास मोकळीक दिली गेल्याने अधिकाऱ्यांवर आधी कारवाई करा, अशी मागणी होत आहे.

कांदळवनाचे संरक्षण करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिले असून त्यासाठी कांदळवन समितीही बनवली गेली आहे. या समितीमध्ये पोलिस, पालिका, महसूल, कांदळवन विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ आदींचे अधिकारी आहेत, परंतु कांदळवन संरक्षणासाठी तक्रार आल्याशिवाय हे सर्व विभाग स्वतःहून कांदळवनाचे संरक्षण करीत करताना दिसत नाहीत, परंतु तक्रार आल्यानंतरही ठोस, प्रभावी कारवाई प्रशासनाकडून केली जात नाही.



घोडबंदर मार्गावरील चेणे येथे राजरोसपणे कांदळवनात दिवसाढवळ्या बेकायदा भराव सुरू आहे. याबाबत संबंधित प्रशासनाला कल्पना दिल्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने कारवाईची मागणी नागरिकांनी केली.

### भरावासह सपाटीकरणही जोरात

- घोडबंदर रोडवर चेणे गाव येथे रस्त्यालगत अनेक दिवसांपासून कांदळवनामध्ये बेकायदा भराव केला जात आहे. भराव व सपाटीकरण करण्यासाठी जेसीबी चालवला जात आहे. पालिका, महसूल, पोलिस, कांदळवन विभाग आदींना सातत्याने कांदळवनामधील बेकायदा भरणी आणि सपाटीकरणाबाबत कळवूनही ठोस कारवाई केली गेली नाही.
- पोलिस, पालिका, महसूल आदींच्या आशीर्वादाने भरणी माफिया आणि भूमाफिया मोकाट असल्याने त्यांची राजरोस कांदळवनामध्ये भराव करून भूखंड तयार करण्याची हिंमत होत आहे. त्यामुळे आधी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना निलंबित करा. येथील बेकायदा भराव तत्काळ बंद करून डम्पर आणि जेसीबी जप्त करा.
- संबंधितांवर गुन्हे दाखल करा आणि न्यायालयाच्या आदेशानुसार झालेली भरणी काढून कांदळवन पूर्ववत करा, अशी मागणी फॉर परचुर हॅबिटॅटचे हर्षद ढगे, गो ग्रीन फाउंडेशन ट्रस्टचे साबीर सय्यद, हरबा कोनापुरे, सत्यकाम फाउंडेशनचे कृष्णा गुप्तासह माजी नगरसेवक रोहित सुवर्णा आदींनी केली आहे.

# बेपत्ता महिलेसह दोन मुले वाराणसीत सापडली

**मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

गेल्या अडीच महिन्यांपासून बेपत्ता असलेली काशीमीरा परीसरातील एक महिला व तिच्या दोन मुलांचा शोध वाराणसी येथे लागला.

त्यांच्या मिसिंगची तक्रार काशीमीरा पोलीस ठाण्यात दाखल केली होती. याचा तपास करून महिलेसह दोन्ही मुलांना वाराणसी येथून शोधून आणण्यात आले.

काशीमीरा पोलीस ठाणे हद्दीतील सुजाता चौधरी (४०) व अभिजीत चौधरी (२२), आदित्य चौधरी (१९) हे तिघेही ५ ऑगस्ट रोजी सकाळी कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेले होते. त्यांची मिसींग तक्रार काशिमिरा पोलीस ठाण्यात दाखल केली होती. तक्रारदार यांनी गुन्हे शाखेशी संपर्क केला. त्यानुसार तपासात मातव्य ठेवून वरील तिन्ही मिसींग व्यक्ती या वाराणसी, उत्तरप्रदेश येथे आढळून आले

### नैराश्येतून सोडले घर

दरम्यान पोलिसांनी चौकशी केली असता त्या महिलेच्या मुलाचे शेअर बाजारात मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खराब झाली होती. याच नैराश्यातून ते घर सोडून गेले होते. ते त्या भागात कुठेही राहत असल्यामुळे त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता. परंतु मध्यवर्ती गुन्हे शाखेने तपास करून त्यांना शोधून काढले व त्यांच्या कुटुंबाच्या स्वाधीन केले आहे.

← पुढारी पा.नं. ६.

लोकमत पु.पा.३.




विरार, नालासोपारा परिसरातून दुचाकी, मोबाइलची चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली.

# सराईत दुचाकी, मोबाइल चोराला केली अटक

## तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क
नालासोपारा : तुळींज परिसरातून ३ दुचाकी व १ मोबाइल चोरणाऱ्या आरोपीला तुळिंजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केल्याची माहिती गुरुवारी जनसंपर्क अधिकारी व सपोनि शिवकुमार गायकवाड यांनी दिली.

तुळींज पोलिस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणात दाट वस्ती आहे. येथील रेल्वे स्टेशन परिसरातून गहाळ झालेल्या मोबाइल आणि दुचाकीबाबत तुळींज पोलिसांना नागरिकांच्या तक्रारी मिळाल्या होत्या. वरिष्ठांच्या सूचनेनुसार तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या तपास सुरू केला. त्यानुसार आरोपी शिवम झा (२७) याला मंगळवारी अटक करण्यात आली. आरोपीकडे अधिक तपास केला असता तो दुचाकी चोरी करण्यात सराईत असल्याचे लक्षात आले.

### चार गुन्ह्यांची उकल

- या आरोपीने गेल्या १५ दिवसांमध्ये विरार परिसरातून दोन दुचाकी व नालासोपारा पश्चिम येथून एका दुचाकीची चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीकडून तुळींज येथील १, विरार येथील २ आणि नालासोपारा येथील १ असे चार गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे. आरोपीकडून पोलिसांनी गुन्ह्यातील २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

- ही अटकेची कामगिरी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त उमेश माने-पाटील, तुळींजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, पोलिस निरीक्षक (गुन्हे) सुधीर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सुनील पवार, सहायक फौजदार शिवानंद सुतनासे, पोलिस हवालदार आनंद मोरे, उमेश वरठा, इस्माईल छपरीबन, जाधव, पोटे, कदम, राजगे यांनी केली आहे.

# भाईंदरमधील मेट्रोचे काम कुणामुळे थांबले?

## मेहतांचा दावा खोटा : अग्रवाल यांचा आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क
मीरा रोड : भाईंदर पश्चिम तोदीवाडी येथील जमीन आपल्या कंपनीने मेट्रो कामासाठी दिल्याचा माजी आ. नरेंद्र मेहतांचा दावा खोटा असून उलट त्यांनीच मेट्रोचे काम बंद पाडले होते. त्यावेळी आपण पालिकेला मेट्रोचे काम पूर्ण करू दिले होते, असे पत्र भाईंदर येथील विकासक श्यामसुंदर अग्रवाल यांनी पालिका आयुक्तांना दिले आहे. त्यामुळे काशिगाव येथील मेट्रोच्या जिन्याचे काम बंद पाडल्याच्या आरोपावरून टीका झालेले मेहता पुन्हा मेट्रोच्या कामावरून चर्चेत आले आहेत.

मीरा-भाईंदरच्या आ. गीता जैन यांनी पत्रकार परिषद घेऊन काशिगाव मेट्रो स्थानकाच्या जिन्याचे काम नरेंद्र मेहतांच्या कंपनीने बंद पाडल्याचा आरोप केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना मेहतांनी भाईंदरच्या तोदीवाडी येथील जमीन मेट्रोच्या कामासाठी दिल्याचे सांगितले होते. मेहतांनी ७११ कन्स्ट्रक्शन कंपनीचे महापालिकेला दिलेले पत्र दाखवले होते.

### अन्य जागांचा मागितला आर्थिक मोबदला

- त्या पत्रात मौजे भाईंदर जुना सर्व्हे क्र. ६५५/ २,३ व ६५७ मधील ८ हजार १६७.८४ चौ.मी. इतकी जागा मेट्रो कामाने बाधित झाल्याचे नमूद आहे. त्यासह अन्य जागांचा आर्थिक मोबदला मागितला आहे.

- श्यामसुंदर अग्रवाल यांनी पालिका आयुक्तांना पत्र देऊन, मेहतांच्या कंपनीचे संचालक संजय सुर्वे यांनी लेखी पत्र देऊन तोदीवाडी येथील जागा त्यांच्या मालकीची असल्याचे खोटे सांगत वर्ष २०२० मध्ये मेट्रोचे काम बंद पाडले होते. आयुक्तांकडे बैठकीत ती जागा आपली असून मेहतांची जमीन नसल्याचे पुरावे दिले.

- ज्या शहराने तुम्हाला इतके श्रीमंत केले, त्याच शहराच्या मेट्रोसारख्या महत्त्वाच्या विकासकामात अडथळे आणणे योग्य नाही. तोदीवाडी येथील मेट्रोचे काम मेहतांमुळे झालेले नाही तर मी मोबदल्यासाठी अडवणूक न करता शहर हितासाठी मेट्रोचे काम पूर्ण करु दिले होते, असे अग्रवाल यांनी पत्रात नमूद केले आहे.

पुण्यनगरी पु.पा.४.

# हनीट्रॅपमध्ये अडकवून वृध्दाकडून ३४ लाखांची लूट

**। वसई:** वसईतील एका ६९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला हनीट्रॅपमध्ये अडकवून तब्बल ३४ लाखांची ऑनलाई लुट करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. नालासोपारा-आचोळे येथे राहणा-या ६९ वर्षांच्या सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाशी २८ एप्रिलला 'कुटुंब' नावाच्या ॲपवरून एका तरुणीने संपर्क केला.त्यांना मधाळ बोलण्यात गुंतवून स्वतःचा नग्न व्हिडियो पाठवला आणि या ज्येष्ठालाही आपला नग्न व्हिडियो पाठविण्यास सांगितले.त्यांनी तसा व्हिडीओ पाठवला आणि तिच्या जाळ्यात ते अडकले.त्यानंतर या नग्न व्हिडियोच्या आधारे तरूणीने त्यांना ब्लॅकमेल करण्यास सुरवात केली.हा व्हिडियो डिलिट करायचा असेल तर पैसे द्या अशी धमकी तिने दिल्यावर घाबरून त्यांनी प्रियांकाचा नंबर डिलीट करून ब्लॉक केला.तिचा नंबर ब्लॉक केल्यावर हे प्रकरण शांत झाले असे त्यांना वाटले.

> याप्रकरणी प्रियांका शर्मा,रामकुमार मल्हौत्रा आणि राहुल शर्मा अशा तीन जणांविरोधात गुन्हे दाखल केले असून,तपास सुरु आहे.
>
> **बाळासाहेब पवार,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,आचोळे**

मात्र त्यानंतर त्यांना रामकुमार मल्होत्रा नावाच्या व्यक्तीचा फोन आला.दिल्ली गुन्हे शाखेतून बोलत असून तुमचे नग्न व्हिडीओ प्रकरण मिटवायचे असेल तर पैसे द्या अशी धमकी देण्यात आली.त्यामुळे घाबरून या ज्येष्ठ नागरिकाने एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यात ऑनलाईन आणि आरटीजीएस द्वारे ३४ लाख रुपये त्यांना दिले.मात्र त्यानंतरही या भामटयांची पैशांची मागणी वाढल्यामुळे अखेर ज्येष्ठाने आचोळे पोलीस ठाणे गाठले.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी ४.१०.२४.

# नालासोपाऱ्यात भीषण आग

## बाजूच्या इमारतीमधील ४० जणांची सुखरूप सुटका

**। वसई :** नालासोपाराच्या पारस नगरमध्ये बुधवारी रात्री नऊच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ४० जणांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. यात ज्येष्ठ नागरिक ,लहान मुलांचाही समावेश होता. रात्री दोनच्या सुमारास ही आग विझवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले आहे. ही आग कशामुळे लागली हे समजू शकले नाही.

नालासोपारा पूर्वेकडील येथील पारस नगरमध्ये बुधवारी रात्री मंडपाच्या सामानाला भीषण आग लागली या आगीत मंडपाचे सारे सामान जळून खाक झाले. यामध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली ४० जणांची सुखरूप सुटका करण्यात आली. धुराचे लोट बाजूला असलेल्या इमारतीमध्ये शिरल्यामुळे आगीची



झळ इमारतीला सुद्धा बसली आहे .ज्येष्ठ नागरिकांना श्वासाच्या त्रासामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे. सर्व रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. ट

॥ घटनेची माहिती मिळताच आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार त्यांची टीम अग्निशमन दलाचे जवान, आमदार क्षितीज ठाकूर, सिद्धार्थ ठाकूर, शिंदे गटाचे नवीन दुबे मनसेचे रवी पाटेकर, भाजपचे राजन नाईक यांच्यासह अनेकांनी या ठिकाणी घटनास्थळाला भेटी दिल्या.आगीत पीडित झालेल्या रहिवाशांना खाण्यापिण्याची व राहण्याची व्यवस्था करण्याची आमदार क्षितीज ठाकूर यांनी सूचना दिल्या आहेत. काळ आला होता पण वेळ आली नव्हती. रात्री अचानक लागलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले होते .आजूबाजूला मोठया प्रमाणात चाळी असून त्याचा फटका येथील नागरिकांना बसला आहे. मात्र अग्निशमन दलाचे जवान वेळीच आल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

# जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून मीरा-भाईंदर विधानसभेचा घेतला आढावा

**। मीरारोड :** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर गुरूवारी जिल्हा अधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे व ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ठाणे जिल्ह्यातील १४५ मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघाला प्रत्यक्ष भेट देऊन निवडणूक कामकाजाचा आढावा घेतला.



मीरा भाईंदर विधानसभा मतदार संघातील निवडणूक कामकाजातील कार्यरत स्ट्राँग रूम, कंट्रोल रूमची जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पाहणी केली. तसेच एक खिडकी योजना पथक, खर्च निरीक्षक पथक, मनुष्यबळ पथक, एसएसटी, एफएसटी, व्हीएसटी, व्हीव्हीटी पथक, कायदा व सुव्यवस्था पथक, ८५ अधिक व दिव्यांग पथक, स्वीप पथक, प्रसार माध्यम पथक व बॅलेट पेपर व मोर्क कॉपी पथक या पथकांची माहिती घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना केल्या तसेच मतदान केंद्राची व मतमोजणी ठिकाणच्या आराखड्याची पाहणी केली. मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. त्याचबरोबर मीरा भाईंदर मतदारसंघातील कार्यरत एसएसटी केंद्र व पोलिस स्थानकांसह काही मतदान केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली.

यावेळी जिल्हा अधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे व ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे सह मीरा भाईंदर मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर, मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे ,१४५ मीरा भाईंदर मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी निलेश गौंड, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी कल्पिता पिंपळे, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, राजकुमार घरत, निवडणूक नायब तहसीलदार प्रदिप मुकणे व सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पु.५१.९.

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार, गुन्हा दाखल

वसई : पुढारी वृत्तसेवा

नालासोपाऱ्यात आणखी एक सामूहिक अत्याचाराची घटना उघडकीस आली आहे. १६ वर्षांच्या मुलीवर तिच्या वर्गमित्रासह दोघांनी धमकावून अत्याचार केला तसेच तिची अश्लील छायाचित्रे काढून तिला धमकावले. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांवर सामूहिक अत्याचार आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

ऑगस्ट महिन्यात पीडितेचा १६ वर्षांचा वर्ग मित्र तिला एका मित्राच्या घरी घेऊन गेला होता. तेथे तिला फूस लावून त्या दोघांनी तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर दोघांनी पुन्हा तिला धमकावून तिच्यावर अत्याचार केला. यावेळी एका आरोपीने चित्रिकरण केले. या आधारे दोघेही तिला धमकावत होते. याप्रकरणी पीडितेच्या आईने नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नालासोपाऱ्यात सहा लाखांची वीजचोरी

**विरार :** विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून नालासोपारा तुळींज पोलिसांनी एका व्यक्तीवर वीज चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. नालासोपारा पश्चिमेला असणाऱ्या उमराळे गावामध्ये आरोपीवर चोरीच्या मार्गाने वीज वापरत असल्याचा आरोप होता. विद्युत विभागाचे यामुळे जवळपास सहा लाख रुपये इतके आर्थिक नुकसान झाले आहे. विद्युत विभागाचे अधिकारी भरत दुधावडे यांना सूचना मिळाली होती की, उमराळेतील डॉमनिक लूस हे मागील दोन वर्षापासून चोरीची वीज वापरत होते. मंगळवारी विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी छापा टाकत २२,५१३ युनिट वीज चोरीला गेली. हे त्यांच्या निदर्शनात आले. यासंदर्भात नालासोपारा तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

## अमली पदार्थाची तस्करी रोखली

**विरार :** वसई पूर्वमधील सातीवलीत गांजा तस्करी करणाऱ्या ३ आरोपींना अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. आरोपींकडून ४ किलो गांजा हस्तगत केला आहे, याची किंमत २ लाख ४ हजार रुपये इतकी सांगण्यात येते. मीरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयातील नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोंना गुप्त बातमीदाराच्या मिळालेल्या माहितीनुसार सातविली परिसरात काही लोक गांजा घेऊन येणार आहेत, अशी माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून आरोपी राम विश्वास पटेल, सुनील रमेश कुमार राजक आणि विनोद कुशल यांना चार किलो गांजा सकट अटक करण्यात आली.

## नायगावमध्ये अभिनेत्रीवर अत्याचार

**विरार :** नायगाव पोलीस स्टेशन अंतर्गत राहणाऱ्या २४ वर्षीय टीव्ही अभिनेत्रीच्या अत्याचार झाल्याच्या तक्रारीवरून आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका व्यक्तीने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केला. पीडित अभिनेत्रीच्या तक्रारीवरून नायगाव पोलिसांनी विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये पीडित अभिनेत्रीची ओळख आरोपीबरोबर झाली होती. आरोपीचे आधीच लग्न झाले होते. आरोपीचा बायकोबरोबर घटस्फोट होणार असल्याचे सांगून पीडित अभिनेत्रीला लग्नाचे आमिष दाखवले व तिच्यावर अत्याचार केला असा आरोप अभिनेत्रीकडून करण्यात आला आहे. या संदर्भात नायगाव पोलीस पुढील तपास करत आहेत.

## माती भराव करून तिवरांची कत्तल

पुढारी पु.५१.८

**मीरारोड :** मीरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रातील घोडबंदर रस्त्यावर असलेल्या चेना गावातील बसस्टॉपच्या पाठीमागे कांदळवन क्षेत्रात रासरोसपणे पर्यावरणाचा ऱ्हास करत माती भराव करून तिवरांच्या झाडांची कत्तल केली जात आहे. याकडे महसूल विभाग, महापालिका, पर्यावरण विभाग व कांदळवन विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. चेना गाव हे अतिसंवेदनशील क्षेत्र (इको सेन्सेटिव्ह झोन) म्हणून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिसूचनेनुसार घोषित करण्यात आलेले आहे. त्यानंतर देखील त्या भागात वन्यजीव आणि वन्यप्राण्यांना त्रास होईल, असे बेकायदा कृत्य केले जात आहे. मौजे चेणे येथील जागेवर तिवरांची मोठं मोठी झाडे असतानाही त्या जागेवर मोठया प्रमाणावर माती भराव करून तिवरांच्या झाडाची कत्तल केली जात आहे. याप्रकरणी पर्यावरण संरक्षण कायदा आणि सीआरझेड कायद्यानुसार गुन्हा दाखल करुन त्या ठिकाणी कांदळवन घोषित करून त्याचे संरक्षण आणि संवर्धन करावे अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच या अगोदरच शासनाच्या वन विभागाने चेना गाव हे संपूर्णपणे इको सेन्सेटिव्ह झोन म्हणून घोषित केलेले असतानाही त्याठिकाणी खुलेआम कत्तल सुरू आहे. त्या ठिकाणी मातीची भरणी काढून ती जागा पूर्ववत करावी, अशी मागणी गो ग्रीन फाऊंडेशन ट्रस्टचे साबीर सय्यद यांनी शासनाकडे केली आहे.

GET /eSCL/Scanners
Host: localhost

Scanned with OKEN Scanner

नवभारत ५.४.२.

## 3 की स्थिति गंभीर आईसीयू में भर्ती, आगजनी से अफरा-तफरी का माहौल

# 2 जगह आग, 2 बच्चे सहित 7 झुलसे

■ नालासोपारा,(सं). वसई तालुका क्षेत्र में आग लगने की घटना रुकने का नाम नही ले रही हैं. बुधवार को भी तालुका के दो अलग अलग स्थानों पर आग लगने की घटना घटी थी. पहली भीषण आग लगने घटना नालासोपारा पूर्व के अचोले, पारस नगर स्थित साडी कम्पाउंड में बनाई गई गोदाम में बुधवार की रात घटी थी. आग कि लपटे इतनी तेज थी कि उसने पड़ोस के एक स्वीटी हाँउस नामक इमारत को अपनी चपेट में ले लिया था. इस दौरान आग से निकलने वाले धुआं पूरी बिल्डिंग में भर गया. जिसके कारण लोगों को सांस लेने में दिक्कतें आने लगी. और पूरी बिल्डिंग में भगदड़ का माहौल बन गया. लोग अपनी जा बचाने के लिए घरों को खुला छोड़ बाहर भागने लगे. पारस मित्र मंडल के युवाओं ने घटना की जानकारी पुलिस और अग्निशमन विभाग को देने के साथ ही बचाव राहत कार्य के लिए खुद युवाओं की टीम आग में कूद पड़ी. और अंदर फंसे लोगों को एक एक कर बाहर निकालने में जुट गए. इस दौरान पुरे परिसर में भारी भीड़ एकत्र थी. घटना के दौरान बताया गया था कि, इमारत में फंसे 25 से ज्यादा रहिवासियों को रेसक्यू कर निकाला गया था.



### बिल्डिंग के लगभग 50 फ्लैट बुरी तरह क्षतिग्रस्त

हादसे दो छोटी बच्चियों सहित कुल सात लोगों के झुलसने का खुलासा हुआ है. जख्मी में वैष्णवी(7), अनुजा (11), लक्षमन महादेव रहाठे (79), सुलक्षणा लक्षमण रहाठे (68), विशाल लक्षमन रहाठे 35, रंजना रघुनाथ घोले 68 व श्रीकला रामचंद्र हुमने (69) शामिल हैं. स्थानीय नागरिकों ने बताया कि, सुलक्षणा राहठे, विशाल लक्षमन रहाठे व रंजना रघुनाथ घोले (68) की स्थिति गंभीर बताई जा रही है. उन्हें उपचार के लिए अस्पताल के आइसीयू में रखा गया है. शेष को प्राथमिक उपचार के बाद घर भेज दिया गया है. साथ ही बताया कि, इस हादसे के कारण बिल्डिंग के लगभग 50 फ्लैट बुरी तरह क्षतिग्रस्त हुए हैं. स्थानीय रहिवासी ने बताया कि टेंट का व्यवसाय करने वाले नासीर नामक व्यक्ति ने साडी कम्पाउंड में अपना गोदाम बना रखा था. वहीं सुखी बांस बल्ली व अन्य सामान रखे हुए थे. कुछ लोग, वहीं पर कूड़े और कागज को एकत्र कर जलाते थे. अग्निशमन विभाग की टीम पहली बार चार दमकल की गाड़ियों की मदद से आग को बुझाकर वापस चली गई थी. लेकिन उनके जाने के कुछ देर बाद ही फिर वहीं से आग की ऊंची लपटे उठने लगी. जिसे दूसरी बार पहुंची टीम ने दिन दमकल की गाड़ियों की मदद से बुझाया.

# मुफ्त बिजली योजना में गड़बड़झाला

## 7.5 हॉर्स पावर के कृषि बिजली पंप, सरकार ने 14 करोड़ 760 करोड़ की दी सब्सिडी

■ वसई, (सं). राज्य सरकार ने बड़े जोश के साथ मुख्यमंत्री बलिराजा मुफ्त बिजली योजना शुरू की है. लेकिन, वास्तव में यह योजना धोखाधड़ी और भ्रमित करने वाला है, इसका एक उदाहरण वसई में सामने आया है, क्योंकि, केवल उन किसानों को बिजली भुगतान माफ कर दिया गया है जिनके पास फार्म पंप नहीं है और जिनका बिजली मीटर 7 साल से पहले हटा दिया गया है, बिजली की खपत दिखाकर बिजली भुगतान माफ कर दिया गया है. राज्य सरकार ने 25 जुलाई 2024 से फार्म पंप वाले किसानों को मुफ्त बिजली देने की घोषणा की थी.

> *संबंधित किसान का मामला वास्तव में क्या है इसकी जांच की जाएगी और उसके अनुसार आगे की कार्रवाई की जाएगी.*
>
> *- संजय खंदारे, अधीक्षण अभियंता, महावितरण विभाग*

### किसानों के लिए शुरू की गई थी मुख्यमंत्री बलिराजा योजना

इस योजना के तहत उन किसानों को मुफ्त बिजली प्रदान की जाती है. जिनके पास 7.5 हॉर्स पावर के कृषि बिजली पंप हैं. सरकार ने दावा किया है कि राज्य के 44 लाख 3 हजार फार्म पंप बिजली उपभोक्ताओं को इसका लाभ मिलेगा. इसके लिए राज्य सरकार ने 14 करोड़ 760 करोड़ रुपए की सब्सिडी दी है. इन योजनाओं के माध्यम से वसई मंडल में 110 सौर कृषि पंप स्थापित किए गए हैं. मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना अंतर्गत 105 और कुसुम योजना के अंतर्गत 5 सौर कृषि पंप स्थापित किये गये हैं. जो वसई डिवीजन में 106 स्थानों और विरार डिवीजन में 4 स्थानों पर सौर कृषि पंप स्थापित हुए हैं. लेकिन इस योजना में एक चौंकाने वाली बात सामने आई है. दावा किया गया है कि जिन किसानों के पास कृषि पंप और बिजली मीटर नहीं है, उनके खाते में बिजली बिल भेजकर बिजली भुगतान माफ कर दिया गया है. विरार पश्चिम के नंदाखाल निवासी मनवेल तुस्कानो के खेत में एक कृषि पंप था. लेकिन वह कृषि पंप जल गया. इसका उपयोग नहीं होने के कारण 2017 में इसका बिजली मीटर भी हटा दिया गया था.





दैनिक भास्कर . 5.

# मीरा-भायंदरः पानी के बर्तन खाली, कैसे मनाएं दिवाली!



## ▪ इंद्रलोक में 56 घंटे से नहीं हुई जलापूर्ति ▪ मनपा प्रशासन नहीं दे रहा है ध्यान

भास्कर संवाददाता | भायंदर

मीरा-भायंदर में पीने के पानी की समस्या खत्म होने का नाम नहीं ले रही है। प्रशासन के तमाम दावों के बावजूद भी सबसे बड़े त्योहार दिवाली में पानी के बर्तन खाली हैं। इंद्रलोक इलाके में 56 घंटे से पानी की आपूर्ति नहीं हुई है, जिससे स्थानीय निवासी बुरी तरह परेशान हैं। पेयजल बंद रखने की पूर्व सूचना भी जल विभाग की ओर से नहीं दी गई थी।





इंद्रलोक फेस-6 कि समृद्धि सोसायटी में 628 फ्लैट हैं। सोसायटी के अध्यक्ष रमाकांत सिंह ने बताया कि 22 अक्टूबर को दोपहर 1.00 बजे पानी आया था। उसके बाद 24 अक्टूबर को शाम 6 बजे तक नलों में पानी नहीं आया। देखा जाए तो लगभग 55- 56 घंटे बीत चुके हैं। इस दौरान 32 निजी टैंकर से बोरिंग का पानी मंगाया जा चुका है। कमोबेश यही हाल आस-पास की दूसरी सोसायटियों का भी है।

**खरीद कर पी रहे पानी:** सुरभी अंकिता ने बताया कि दिवाली का समय चल रहा है। घरों में साफ-सफाई और रंग-रोगन का काम शुरू है, लेकिन पानी के बर्तन खाली हैं। ऐसे में सफाई का काम करने में दिक्कत हो रही है। प्रीति शर्मा ने बताया कि नहाने-धोने का काम तो जैसे तैसे चल जाता है। पीने के लिए पानी का कैन खरीदना पड़ रहा है। जलापूर्ति बाधित होने के कारणों को जानने के लिए मीरा-भायंदर मनपा के कार्यकारी जलापूर्ति अभियंता शरद नानेगांवकर से संपर्क किया गया, लेकिन उन्होंने फोन नहीं उठाया।

**मनपा ने नहीं दी थी सूचना:** सिंह ने कहा कि जलापूर्ति बंद रखने की पूर्व सूचना भी जल विभाग ने नहीं दी थी। उन्होंने कहा कि दो महीने में सात से आठ बार ऐसा हो चुका है। हर बार 25 से 30 टैंकर पानी मंगाना पड़ता है। इसमें ज्यादा पैसा खर्च होता है। फिर भी पीने का शुद्ध पानी निवासियों को नसीब नहीं हो पाता है। बोरिंग के पानी से सिर्फ नहाने-धोने का ही काम होता।

## नालासोपारा में बुलेट चोर गिरफ्तार
## 15 दिन में कर चुका है चार वारदात

**भास्कर संवाददाता। विरार** वसई-विरार शहर में बुलेट और मोबाइल चोरी करनेवाले एक शातिर चोर को गिरफ्तार करते हुए तुलिंज पुलिस ने चार मामलों का खुलासा किया है। तीन बाइक समेत ढाई लाख रुपए का सामान बरामद किया है। आरोपी की पहचान विरार निवासी शिवम सुधीर झा के रूप में हुई है। पुलिस ने बताया कि आरोपी शिवम सुधीर झा शातिर चोर है। इसने 15 दिन में नालासोपारा और विरार क्षेत्र में चार चोरी की वारदात को अंजाम दिया है। पुलिस टीम मुखबिरों की सूचना और सीसीटीवी के आधार पर आरोपी को गिरफ्तार किया है।

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर 5.

# ...नी ट्रैप में फंसाकर बुजुर्ग से वसूले 34 लाख रुपए महिला सहित तीन लोगों के खिलाफ शिकायत दर्ज

भास्कर संवाददाता | वसई

नालासोपारा में हनी ट्रैप का मामला सामने आया है। एक महिला ने क्षेत्र के बुजुर्ग व्यक्ति को अपने हुस्न के जाल में फंसाकर 34 लाख रुपए ऐंठ लिए। इस मामले में अचोले पुलिस ने महिला समेत तीन लोगों के खिलाफ आईटी एक्ट के तहत मामला दर्ज किया है। वसई-विरार क्षेत्र में युवा ही नहीं, बल्कि बुजुर्ग भी हनी ट्रैप का शिकार हो रहे हैं।

पुलिस मुताबिक, सेवानिवृत्त 69 वर्षीय शिकायतकर्ता नालासोपारा (पूर्व) अचोले क्षेत्र का निवासी हैं। 28 अप्रैल को 'कुटुंब' एप के जरिए प्रियंका शर्मा नाम की लड़की ने उनसे संपर्क किया था। प्रियंका ने मीठी-मीठी बातें करके शिकायतकर्ता को अपने हुस्न के जाल में फंसा लिया था। उसने अपना न्यूड वीडियो भेजकर शिकायतकर्ता से भी अपना न्यूड वीडियो भेजने के लिए कहा। शिकायतकर्ता उसके प्रेमजाल में फंसकर अपना न्यूड वीडियो महिला को भेज दिया। इसके बाद से प्रियंका ने शिकायतकर्ता को ब्लैकमेल करना शुरू कर दिया।



प्रतीकात्मक चित्र

## न्यूड वीडियो डिलीट करने के मांगे पैसे

पुलिस ने बताया कि प्रियंका ने कहा कि अगर न्यूड वीडियो डिलीट करना है तो पैसे देने होंगे। शिकायतकर्ता बुजुर्ग डर गया और बदनामी के डर से प्रियंका का नंबर डिलीट करके उसे ब्लॉक कर दिया। शिकायतकर्ता को लगा कि प्रियंका का नंबर ब्लॉक करने से मामला शांत हो गया, लेकिन उसके तुरंत बाद ही शिकायतकर्ता के पास राजकुमार मल्होत्रा के नाम से एक फोन आया।

## दिखाया था गिरफ्तारी का डर

पुलिस ने बताया कि मनोज ने अपना परिचय दिल्ली क्राइम ब्रांच के रूप में दिया। उसने गिरफ्तार करने का डर दिखाकर मामले को निपटाने के लिए पैसे की मांग की। इसके बाद से आरोपियों ने शिकायतकर्ता से [illegible] ऑनलाइन और आरटीजीएस के माध्यम से 34 लाख रुपए ऐंठ लिए। फिलहाल, इन आरोपियों की ओर से पैसे की मांग बढ़ती जा रही थी। आखिरकार शिकायतकर्ता ने अचोले पुलिस स्टेशन में सभी के खिलाफ शिकायत दर्ज कराई।

## वसई में जिस्मफरोशी, महिला गिरफ्तार

वसई में जिस्मफरोशी करानेवाली एक महिला एजेंट को एंटी ह्यूमन ट्रैफिकिंग सेल ने गिरफ्तार किया है। इस कार्रवाई में पुलिस ने दो महिलाओं को भी छुड़ाया है। पुलिस ने बताया कि एंटी ह्यूमन ट्रैफिकिंग सेल [illegible] को मुखबिरों से सूचना मिली कि वसई रेंज नाका स्थित एक शिवसागर होटल में जिस्मफरोशी का कारोबार चल रहा है। इस होटल में ग्राहकों की डिमांड पर महिलाओं की सप्लाई की जाती है। पुलिस टीम ने फर्जी ग्राहक भेजकर मामले की पुष्टि की। इसके बाद छापा मारा।

पीड़ित से धोखाधड़ी की शुरुआत अप्रैल में शुरू हुई थी। पुलिस ने प्रियंका शर्मा, रामकुमार मल्होत्रा, राहुल शर्मा के खिलाफ मामला दर्ज किया है। फिलहाल मामले की जांच चल रही है।
**-बालासाहेब पवार,** वरिष्ठ पुलिस निरीक्षक, अचोले पुलिस स्टेशन

# मीरा रोड में निर्दलीय प्रत्याशी को कांग्रेस नेता का समर्थन

- महाविकास आघाडी को लग सकती है चपत

भास्कर संवाददाता | भायंदर

145-मीरा-भायंदर विधानसभा सीट से पूर्व नगरसेवक हंसू कुमार पांडे ने ताल ठोक दी है। खास बात है कि उनको प्रदेश कांग्रेस के टीवी मीडिया पैनलिस्ट संदीप पांडे का पूरा समर्थन मिला हुआ है। वे उनके साथ साए की तरह रह रहे हैं। गुरुवार को हजारों की भीड़ के साथ नामांकन भरने और बुधवार को पत्रकार परिषद के दौरान संदीप पांडे मौजूद रहे।



हंसू पांडे ने बताया कि विकास और भ्रष्टाचार के मुद्दे पर वे चुनाव लड़ रहे हैं। उत्तन डंपिंग ग्राउंड को शिफ्ट कराना, 24 घंटे पानी, अस्पताल, खेल मैदान, स्टील इंडस्ट्रीज को बढ़ावा देना, पुरानी इमारतों का क्लस्टर, कन्या विद्यालय, युवाओं को रोजगार उपलब्ध कराना उनके वादे नहीं, इरादे हैं। स्वच्छ छवि के हंसू पांडे तीन बार नगरसेवक, गुट नेता, लंबे समय तक कांग्रेस सेवादल के अध्यक्ष व भाजपा के जिला उपाध्यक्ष रह चुके हैं। संदीप पांडे का मीरा-भायंदर में स्वतंत्र गुट है और वे कांग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले के बेहद करीबी माने जाते हैं। उनके हंसू कुमार पांडे को समर्थन देने से महाविकास आघाडी के प्रत्याशी को नुकसान उठाना पड़ सकता है। संदीप पांडे ने कहा कि कांग्रेस का अभी तक प्रत्याशी घोषित नहीं हुआ है। वे उत्तर भारतीय महासंघ के उपाध्यक्ष भी हैं। उत्तर भारतीय के नाते वे हंसू कुमार पांडे का समर्थन कर रहे हैं।

Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal - [illegible]

# Missing for two months, family traced to UP

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

More than two months after three members of family – a woman and her two sons – had mysteriously disappeared from their apartment in the Penkarpada area of Kashimira, the central crime unit (CCU) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) traced them in a village in Uttar Pradesh on October 22.

The police learnt that the mother and sons were fed up with frequent arguments with Mithilesh over domestic issues and had left home with a plan to relocate in UP.

Mithilesh Jogi Choudhary, 45, told the Kashimira police that his wife-Sujata, 40, sons Abhijeet, 22, and Aditya, 19, were missing since August 5 morning. On the virtue of electronic surveillance, they learnt about their presence in Varanasi and the trio was traced to Bhiti-Sultanpur village. Later, the family was counselled by the police officials.

Scanned with OKEN Scanner

Times of India - 5.



# Two minors gang-rape teen, booked under Pocso

Sandhya.Nair
@timesofindia.com

**Mumbai:** A 16-year-old girl in Vasai was allegedly gang-raped by two minors, including one of her classmates. The teenagers have been detained and booked under sections of Pocso and the IT Act.

The sexual abuse began in Aug when the teenager, who studies in Class XI and her classmate, of the same age, got close. The boyfriend took the girl to one of his 17-year-old friend's homes, police said. The boyfriend allegedly engaged in a sexual act with her in the flat. His friend also had sex with her. He recorded the sexual act and then allegedly blackmailed the girl into having a relationship with them on multiple occasions. The girl was called to the home of the 17-year-old friend.

The girl eventually confided in her mother, who approached the local police recently. Police said they are examining the accused teenagers' cell phones for the videos of the sexual act. Police said they are investigating if initially the boyfriend's friend shot the video of the sexual act without their knowledge and whether he used it to blackmail both the girl and the boyfriend.

# Honey-trapped, senior citizen loses ₹34 lakh

**Mumbai:** A 69-year-old man from Nalasopara fell victim to a honey trap, losing Rs 34 lakh in the process. The senior citizen received a WhatsApp message in April, inviting him to join a group described as being like a 'family'. Once he joined, a woman began chatting with him and even went topless during a video call. The victim, in turn, recorded and shared nude videos of himself with the woman, who then started blackmailing him for money.

The victim blocked the woman's number and deleted the videos. However, he soon began receiving calls from unknown numbers. Two men, claiming to be from the Delhi crime branch, extorted money from him. The victim then approached the Achole police who registered a case against the three unknown persons. TNN

# ₹88L payout for kin of '17 rd mishap victim

**Thane:** The Motor Accident Claims Tribunal (MACT) in Thane awarded Rs 88 lakh compensation to the family of a 28-year-old assistant flight instructor who died in a road accident 7 years ago.

According to the claimants, which include the widow, father, and brother, the victim was riding a motorcycle near Sativali-Vasai flyover when a trailer, driven negligently and recklessly, crashed into him on Dec 24, 2017. A police case was registered against the driver, and the vehicle was insured by a firm which was later involved in the compensation claim. The MACT chairperson, after hearing both sides, ruled in favour of the petitioners, confirming the negligence of the trailer driver as the cause of the accident. The verdict came after four years of legal proceedings.
—Nishikant Karlikar

Scanned with OKEN Scanner